जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

"विधी सेवा सदन", जिल्हा न्यायालय परिसर,
जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली - ४४२६०५

मोबाईल क्रमांक - ८५९१९०३९३३

Email Address – gad-dlsa.mh@bhc.gov.in

जा. क./जा.सू./१७९१ /२०२६.
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.
दिनांक :- ०५/०८/२०२६.

जाहीर सूचना/नोटीस

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली आणि अंतर्गत असलेल्या तालुका विधी सेवा समित्यांच्या (TLSCs) पॅनेलवर अधिकार मित्र (पॅरा-लीगल व्हॉलेंटियर्स(PLV)) म्हणून निवड करण्यासाठी खाली तक्त्यात नमूद केलेल्या कार्यक्षेत्राकरीता तक्त्यात नमूद केलेल्या पात्र इच्छुक स्थानीक रहिवाशांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. क.	कार्यालयाचे तपशिल	संभाव्य संख्या	कार्यक्षेत्र	अर्जदाराचे राहण्याचे ठिकाण
१	जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.	१००	गडचिरोली व गडचिरोली तालुका	अर्जदार हा गडचिरोली व गडचिरोली तालुक्यातील रहिवाशी असावा.
२	तालुका विधी सेवा समिती, अहेरी.	५०	अहेरी, एटापल्ली व भामरागड तालुका	अर्जदार हा अहेरी, एटापल्ली व भामरागड तालुक्यातील रहिवाशी असावा.
३	तालुका विधी सेवा समिती, आरमोरी.	५०	आरमोरी व आरमोरी तालुका	अर्जदार हा आरमोरी व आरमोरी तालुक्यातील रहिवाशी असावा.
४	तालुका विधी सेवा समिती, चामोर्शी.	५०	चामोर्शी व मुलचेरा तालुका	अर्जदार हा चामोर्शी व मुलचेरा तालुक्यातील रहिवाशी असावा.

५	तालुका विधी सेवा समिती, देसाईगंज.	५०	देसाईगंज व देसाईगंज तालुका	अर्जदार हा देसाईगंज व देसाईगंज तालुक्यातील रहिवाशी असावा.
६	तालुका विधी सेवा समिती, धानोरा.	५०	धानोरा व धानोरा तालुका	अर्जदार हा धानोरा व धानोरा तालुक्यातील रहिवाशी असावा.
७	तालुका विधी सेवा समिती, कुरखेडा.	५०	कुरखेडा, कोरची तालुका	अर्जदार हा कुरखेडा व कोरची तालुक्यातील रहिवाशी असावा.
८	तालुका विधी सेवा समिती, सिरोंचा.	५०	सिरोंचा व सिरोंचा तालुका	अर्जदार हा सिरोंचा व सिरोंचा तालुक्यातील रहिवाशी असावा.

१. स्वरूप व मानधन :-

- हे पद पुर्णत: ऐच्छिक समाजसेवेचे असून हे कोणत्याही प्रकारचे शासकीय पद, नोकरी किंवा वेतनाचा अधिकार देणारे पद नाही.
- या कामासाठी कोणतेही नियमित वेतन दिले जाणार नाही. केवळ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले दैनिक मानधन (Honorarium) देय राहील (सध्या मानधन प्रतीदिन ७५०/- रूपये आहे).

२. पात्रता :-

- अर्जदार वर तक्त्यात नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी तक्यात नमूद केलेला स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे.
- अर्जदार किमान साक्षर असणे आवश्यक आहे (इयत्ता १० वी उर्त्तीण उमेदवारांना प्राधान्य). तसेच त्यांच्याकडे एकंदरीत आकलन क्षमता असणे आवश्यक आहे.

३. खालील प्रर्वगातील व्यक्ती अर्ज करू शकतात :-

- शिक्षक (सेवानिवृत्त शिक्षकांसह).
- सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी आणि वरिष्ठ नागरिक.
- एम.एस.डब्ल्यू. (M.S.W.) चे विद्यार्थी व शिक्षक.
- अंगणवाडी सेविका.
- डॉक्टर/वैद्यकीय व्यावसायिक.
- विद्यार्थी आणि कायदेविषयक विद्यार्थी (वकील म्हणून नोंदणी होईपर्यंत).
- गैर-राजकीय, सेवाभावी संस्था (NGOs) आणि क्लबचे सदस्य.

- महिला शेजार गट (Women Neighbourhood Groups), मैत्री संघ आणि दुर्बल/वंचित ६ टकांच्या स्वयंसहाय्यता गटांचे (Self Help Groups) सदस्य.
- कारागृहात दिर्घ मुदतीचे शिक्षा भोगत असलेले, उत्तम वर्तन असलेले सुशिक्षित बंदी/कैदी.
- इतर कोणतीही व्यक्ती ज्यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समिती अधिकार मित्र म्हणून नियुक्त करण्यास योग्य समजेल.

४. अपात्रतेच्या अटी व काढून टाकण्याचे नियम :-

खालीलपैकी कोणत्याही एका स्थितीत आढळल्यास अर्जदार अधिकार मित्र (पॅरा-लीगल व्हॉलेंटियर्स(PLV)) म्हणून नियुक्तीसाठी अपात्र ठरवला जाईल किंवा त्याची नियुक्ती मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे द्वारे चौकशीअंती कोणतीही पूर्वसुचना न देता रद्द केली जाईल:

- अधिकार मित्र (पॅरा-लीगल व्हॉलेंटियर्स(PLV)) योजनेच्या कामकाजात/उद्देशात अनास्था दर्शवल्यास.
- न्यायालयाने नादार म्हणून घोषीत केले असल्यास.
- कोणत्याही गुन्ह्याचा आरोप असल्यास/आरोपी असल्यास.
- शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या अधिकार मित्र म्हणून कार्य करण्यास असमर्थ ठरल्यास.
- पदाचा गैरवापर केला असल्यास किंवा सार्वजनिक हितास बाधा पोहोचवणारे गैरवर्तन केले असल्यास.
- कोणत्याही राजकीय पक्षाचा/संघटनेचा सक्रिय राजकीय कार्यकर्ता किंवा पदाधिकारी असल्यास.

५. अर्ज करण्याची पद्धत :-

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह खाली दिलेल्या पत्यावर दिनांक १३ ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत हस्तोबाहेर सादर करावे. त्यानंतर आलेल्या अर्जांचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

टीप :- अपुर्ण अर्ज किंवा मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या निश्चित (Shortlist) करण्याचा पुर्ण अधिकार निवड समितीस राहील.

७. अर्ज दाखल करण्याचा पत्ता :-

१) गडचिरोली व गडचिरोली तालुका :-

मा. सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
'विधी सेवा सदन', जिल्हा न्यायालय परिसर,
गडचिरोली - ४४२६०५.

२) अहेरी, एटापल्ली व भामरागड तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अहेरी.

३) आरमोरी व आरमोरी तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, आरमोरी.

४) चामोर्शी व मुलचेरा तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चामोर्शी.

५) देसाईगंज व देसाईगंज तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, देसाईगंज.

६) धानोरा व धानोरा तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, धानोरा.

७) कुरखेडा व कोरची तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कुरखेडा.

८) सिरोंचा व सिरोंचा तालुका :-

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती तथा
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा.

5/8/26

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.

स्थळ :- गडचिरोली.
दिनांक :-०५/०८/२०२६.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
अधिकार मित्र (PLV) पदासाठी अर्जाचा नमुना

प्रति,

मा. सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.

नुकतेच काढलेला फोटो

विषय :- अधिकार मित्र (PLV) म्हणून निवड होणेबाबत.

१.	कोणत्या कार्यक्षेत्रात अर्ज केला आहे त्या कार्यक्षेत्राचे नाव	:	.....
२.	अर्जदाराचे नाव	:	.....
३.	लिंग (पुरूष/महिला/इतर)	:	.....
४.	जन्मतारीख आणि वय	:	.....
५.	कायमचा पत्ता	:	....
६.	पत्रव्यवहाराचा पत्ता	:	....
७.	दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक	:	.....
८.	ई-मेल आयडी	:	.....
९.	शैक्षणिक पात्रता	:	....
१०.	संगणक ज्ञान (आहे/नाही)	:	.....
११.	सध्याचा व्यवसाय वर्ग (उदा. गृहिणी/विद्यार्थी/निवृत्त कर्मचारी /सामाजिक कार्यकर्ते इ.)	:	.....
१२.	प्रवर्ग (Category)	:	.....
१३.	सामाजिक कार्याचा अनुभव (होय/नाही)	:	.....

दिनांक : / /२०

अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

ठिकाण :

(नाव.....)

घोषणापत्र

१. मी, ... असे घोषित करतो/करते की, वरील अर्जात दिलेली सर्व माहिती माझ्या वैयक्तिक माहिती व विश्वासानुसार पूर्णपणे सत्य व बरोबर आहे.

२. मला हे पूर्णपणे मान्य व ज्ञात आहे की, अधिकार मित्र हे कोणतेही नोकरीचे किंवा वेतनाचे पद नाही. हे पुर्णत: ऐच्छिक समाजकार्य आहे. माझी निवड झाल्यास मी प्राधिकरणाच्या नियमांनुसार प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करेन.

दिनांक : / /२०

अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

ठिकाण :

(नाव.....)

तालुका विधी सेवा समिती .....
विधी स्वयंसेवक (PLV) पदासाठी अर्जाचा नमुना

प्रति,

मा. अध्यक्ष,
तालुका विधी सेवा समिती,
अहेरी/आरमोरी/चामोर्शी/देसाईगंज/धानोरा/कुरखेडा/सिरोंचा.

नुकतेच काढलेला फोटो

विषय :- विधी स्वयंसेवक (PLV) करीता निवड होणेबाबत.

संदर्भ :- आपली दिनांक ..... रोजीची विधी स्वयंसेवक या पदाकरीता जाहिरात.

१. कोणत्या कार्यक्षेत्रात अर्ज केला आहे त्या कार्यक्षेत्राचे नाव : .....

२. अर्जदाराचे नाव : .....

३. लिंग (पुरुष/महिला/इतर) : .....

४. जन्मतारीख आणि वय : .....

५. कायमचा पत्ता : .....
.....

६. पत्रव्यवहाराचा पत्ता : .....
.....

७. दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक : .....

८. ई-मेल : .....

९. सध्याचा व्यवसाय वर्ग (उदा. गृहिणी/विद्यार्थी/निवृत्त कर्मचारी /सामाजिक कार्यकर्ते ई.) : .....

१०. जात प्रवर्ग (खुला/SC/ST/OBC/अल्पसंख्यांक) : .....

११. सामाजिक कार्याचा अनुभव (होय/नाही) (असल्यास संक्षिप्त माहिती द्यावी) : .....
.....

शैक्षणिक पात्रतेचा तपशील :-

अ.क्र.	उत्तीर्ण परीक्षा	शाळा/महाविद्यालयाचे नाव	बोर्ड/विद्यापीठ	उत्तीर्ण वर्ष	एकूण मिळालेले गूण/टक्केवारी
१	इयत्ता १० वी				
२	इयत्ता १२ वी				
३	पदवी				
४	पदव्युत्तर पदवी				
५	इतर				

..२..

तांत्रिक किंवा इतर कौशल्ये

१. संगणक ज्ञान :- MS-CIT/ इतर : .....

२. भाषेचे ज्ञान (होय/नाही) :-

मराठी	:	
इंग्रजी	:	
हिंदी	:	

घोषणापत्र

१. मी अशा घोषणा करतो/करते की, वरील अर्जात दिलेली सर्व माहिती माझ्या वैयक्तिक माहितीनुसार आणि समजुतीप्रमाणे पूर्णपणे सत्य व बरोबर आहे.

२. मला पूर्ण जाणीव आहे की, विधी स्वयंसेवक हे पद मानद व ऐच्छिक सेवाभावी स्वरूपाचे असून ही शासकीय नोकरी नाही. या कामासाठी मला निश्चित वेतन किंवा पगार मिळणार नाही, केवळ प्राधिकरणाने ठरवून दिलेले मानधन मिळेल.

३. मी कोणत्याही राजकीय पक्षाचा/संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता नाही आणि माझ्यावर कोणताही फौजदारी गुन्हा न्यायालयात दाखल नाही.

दिनांक : / /२०

अर्जदाराची स्वाक्षरी व नाव

ठिकाण :

(नाव.....)